मजकुर :—

दिनांक २९/०७/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **Best Detection of the Month** माहे जुन २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२१

| | | |
|---|---|---|
| १० | कांदीवली पोलीस ठाणे परिमंडळ — ११ | गु.र.क्र. ५९१ /२०२१ कलम ३०८,२६८, २७० २७४,२७५,२७६,४१९, ४२०, ४६५,४६७, ४६८, ४७०, ४७१, ३४, १८८, १२०(ब) भादवि सह कलम ४३,६६(क) आय.टी.ॲक्ट, सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम व कलम ५२ डिझास्टर मॅनेजमेन्ट ॲक्ट तसेच कलम १८(अ) १८(ब)२४,२७,२८,२८(अ) ड्रग्स ॲन्ड कॉस्मेटिक अधिनियम, |

### —: ‘ बनावट कोवीड लसीकरण मोहिम ’ :—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात आयोजक महेंद्र सिंग, व इतर यांनी देशात व जगात चालू असलेल्या कोविड—१९(करोना),या महामारीच्या काळात आपसात संगनमत करून कोवीड वॅक्सिन देण्याकरिता लसीकरणाच्या ठिकाणी प्रशिक्षित डॉक्टर्स व नर्सेस यांची नेमणूक न करता सिल तुटलेल्या वॅक्सीन बॉटलमधून भेसळयुक्त लससदृश्य द्रव्य जाणीवपुर्वक दिले. असे करून फिर्यादी व इतर सर्व सदस्यांचे जिवितास धोका निर्माण केला. त्यानंतर हॉस्पिटल्समध्ये वॅक्सिन घेतल्याचे वेगवेगळया तारखांची ऑनलाईन माहिती भरून देण्यात येणारे प्रमाणपत्र हे खरे असल्याचे भासवून फिर्यादी व इतर सभासदांची फसवणुक केली. म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. कार्तिक राजेश शाह वय ४० वर्षे, |
| फसवणुक केलेली रक्कम | :— | एकुण ४,५६,००/— रूपये |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) मो.कार क्र.MH 04 EF 7691<br>२) आरोपीताचे मोबाईल<br>३) रोख रक्कम १५,००,०००/—<br>४) खोटे लसीकरण प्रमाणपत्र<br>५) गुन्हयात वापरलेले ०२ कोव्हीशिल्ड व ०१ कॉवॅक्सीनचे रिकामे वाईल्स,<br>६) शिवम हॉस्पीटलच्या लेटरहेडवर बनविलेले लसीकरणाबाबतचे प्रमाणपत्र<br>७) शिवम हॉस्पीटलचे सी.सी.टि.व्हीचे डिव्हीआर<br>८) गुन्हयात खोटे लसीकरण करण्याकरीता वापरलेले सिरीज<br>९) गुन्हयात वापरण्यात आलेले एन एस वॉटरच्या रिकाम्या ०२ बॉटल्स |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) महेद्र प्रताप सिंग वय ३९ वर्षे,<br>२) संजय विजय गुप्ता वय २९ वर्षे<br>३) चंदन रामसागर सिंह वय ३२ वर्षे,<br>४) नितीन वसंत मोडें वय ३२ वर्षे<br>५) मोहम्मद करीम अकबर अली वय १९ वर्षे<br>६) गुडीया रामबली यादव वय २४ वर्षे,<br>७) शिवराज छोटूराज पटारीया वय ६२ वर्षे<br>८) निता शिवराज पटारीया वय ६० वर्षे<br>९) मनिष मंगलप्रसाद त्रिपाठी वय २६ वर्षे,<br>१०) राजेश दयाशंकर पांडे वय ४७ वर्षे<br>११) राहूल उदयराज दुबे वय ३३ वर्षे,'.<br>आरोपी क्र. ०१ जे ०४ अटक दि. १८/०६/२१ रोजी.<br>आरोपी क्र. ०५ व ११ अटक दि. २०/०६/२१ रोजी. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हात दि.३०/०५/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता हिरानंदानी सोसायटी, क्लब हाउस मध्ये ठरल्याप्रमाणे लस कॅम्प होता. सदर वेळी फिर्यादी श्री कार्तिक राजेश शाह

वय ४० वर्षे, व त्यांचा भाऊ चिराग यांनी वॅक्सिन घेताना वॅक्सिन बॉटलचे सिल तुटलेले असल्याचे पाहिले. दिनांक ०८/०६/२०२१ रोजी सोसायटीच्या एका एका सभासदांना वॅक्सिन घेतलेबाबत प्रमाणपत्राचे संदेश कोविन ॲप्स मध्ये येवू लागले. त्यामध्ये वेगवेगळया हॉस्पिटल्सकडून जसे लाईफ लाईन केअर रूग्णालय, नेस्को—१ कोविड सेंटर व नानवटी रूग्णालय या रूग्णालयाचे प्रमाणपत्र येवू लागले. तसेच संजय गुप्ता व महेंद सिंग हा देखील पीडीएफ करून पाठवित होते. त्यादरम्यान फिर्यादी व त्यांची पत्नी निकिता, भाऊ चिराग व त्याची पत्नी यांचे कोविन ॲप्स वर चेक केले असता कोणतेही प्रमाणपत्र अपलोड झाल्याचे दिसून आले नाही.

तसेच महेंद्र सिंग याचेकडे वॅक्सिन बॅचबाबत विचारणा केली असता त्याने सदरचे वॅक्सिन्स हे शिवम हॉस्पिटलचे डॉ. मनीष त्रिपाठी यांचेकडून घेतले असल्याचे सांगितले. सदस्यांनी शिवम हॉस्पटले येथे दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांनीही समर्पक उत्तरे दिली नाही. त्यावरून फिर्यादी तसेच लस घेतलेल्या सर्वांचा संशय बळावला. त्यानंतर वॅक्सिन कॅम्प संदर्भात फसवूणक झालेबाबत तक्रार देण्यात आली.

तक्रारीच्या अनुषंगाने तपासात वॅक्सीनेशन कॅम्प हा कोकीळाबेन रूग्णालयातील कर्मचारी राजेश पांडे याचे मार्फत आयोजीत होता. असे कळले. आरोपी राजेश पांडे यांनी मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे विनंती अर्ज केला होता परंतू मा. न्यायालयाने पाहीजे आरोपी राजेश पांडे यांचे अटकपुर्व जामिन फेटाळला. तसेच गुन्हयातील आरोपी महेद्र सिंग याचे मोबाईलचे सी.डी.आर ॲनिलिसिस करून त्याचे लोकेशन प्राप्त करण्यात आले व त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. तसेच आरोपी संजय गुप्ता हा वॅक्सीनेशन कॅम्पचे देखभाल करीत असल्याने त्यास अटक करण्यात आली.

वॅक्सीनेशन केलेल्या लोकांना लसीकरणाचे प्रमाणपत्र देण्याकरीता लाईफ लाईन मेडीकेअर गोरेगाव, मुंबई येथे काम करणारे चंदन सिंह, व नितीन मोडे यांना प्रमाणपत्र देण्याकरीता रू. ४०,०००/— रूपये दिले असल्याबाबत निष्पन्न झाल्याने नमूद गुन्हयात चंदन सिंह व नितीन मोंडे याना अटक करण्यात आली. तसेच चंदन सिंह याने नेस्को १ कोवीड सेन्टर, गोरेगांव, मुंबई येथे डाटा नोंदणी करणारी मुलगी नामे गुडीया रामबली यादव हिचे मदतीने नेस्को १, कोवीड सेन्टर येथून ९ लोकांना वॅक्सीनेशन संदर्भात कोवीन ॲपवर माहीती अपलोड करून प्रमाणपत्र दिले असल्याचे समोर आल्याने गुडीया रामबली यादव हिला नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

कोव्हीशिल्ड वॅक्सीनचे वाईल्स घेवून जाणारा मोहम्मद करीम अकबरअली याचे नांव समोर आले. त्याचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून सी.डी.आर चे अवलोकन केले असता तो मुळगावी जात असल्याची माहीती समोर आल्याने सतना रेल्वे स्टेशन, मध्यप्रदेश या ठिकाणी ताब्यात घेण्यात आले. नमूद गुन्हयाच्या तपासात डॉ. हरेश शहा यांनी शिवम हॉस्पीटल येथून महेद्र सिंग याचे मार्फत कोव्हीशिल्डच्या ३८ वाईल्स घेतले असल्याचे समोर आल्याने नमूद गुन्हयाचे मुळ केन्द्र हे शिवम हॉस्पीटल असल्याने शिवम हॉस्पीटलचे डॉ. शिवराज पटारीया व त्याची पत्नी निता पटारीया यांना तपासकामी पोलीस ठाणेस बोलाविण्यात आले त्यांचेकडे केलेल्या तपासामध्ये त्यांचा नमूद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन झाल्याने शिवम हॉस्पीटलचे डॉ.शिवराज पटारीया व त्यांची पत्नी निता पटारीया यांना नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.

अटक आरोपी मो.करीम अकबरअली याचेकडे केलेल्या तपासात के.ई.सी.पी.इस्टिट्यूट चे डायरेक्टर डॉ.मनिष त्रिपाठी याने वॅक्सीनेशन कॅम्पचे ठिकाणी कोव्हीशिल्डचे वाईल्स देत असल्याचे समोर आल्याने डॉ मनिष त्रिपाठी याचे शोध घेत असताना मनिष त्रिपाठी याने मा. सत्र न्यायालय, दिडोशी, मुंबई येथे अटकपुर्व जामिन मिळणेकरीता विनंती अर्ज केला असता मा. न्यायालयाने जामिन फेटाळला.

त्यानंतर आरोपी मनिष त्रिपाठी हा त्याचे वकीलासह पोलीस ठाणेस हजर झाला असता त्याचे नमूद गुन्हयात सहभाग असल्याने त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.गुन्हयातील पाहीजे आरोपी राजेश पांडे याचे मोबाईलचे आय.पी.डी.आर प्राप्त करून ॲनिलिसिस केले असता राजेश पांडे हा

बारामती येथील एका लॉज मध्ये वास्तव्यास असल्याचे दिसून आले. बारामती पोलीस ठाणेचे मदतीने त्यास ताब्यात घेवून मुंबईत आणून अटक करण्यात आली.

अटक आरोपी डॉ.मनिष त्रिपाठी याचेकडे केलेल्या चौकशी दरम्यान शिवम हॉस्पीटल या ठिकाणी एका रूममध्ये रिकाम्या कोव्हीशिल्ड वाईल मध्ये नॉर्मल सलाईन वॉटर भरण्याचे काम करताना त्याचे सोबत शिवम हॉस्पीटलचे निता पटारीया व शिवम हॉस्पीटल मधील कर्मचारी राहूल दुबे याचा सहभाग असल्याचे समोर आल्याने राहूल दुबे यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.

नमूद गुन्हयात आतापर्यंत एकुण ११ आरोपीताना अटक करण्यात आली. तपासादरम्यान सर्व अटक आरोपीताचे बॅंक खाते सिल करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्व अटक आरोपीतांचे मोबाईल हे रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविण्यात आलेले आहेत. नमूद गुन्हयाच्या तपासामध्ये दिनांक २४/०५/२०२१ रोजी रिट्रीरी हॉटेल, मालाड या ठिकाणी वरील सर्व आरोपीताची बैठक आयोजित केली होती त्यावेळी नमूद वॅक्सीनेशन कॅम्पच्या संदर्भात कट रचन्यात आल्याचे समोर आहे.

तसेच नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये विविध ठिकाणी आरोपीतांनी वॅक्सीनेशनचे शिबीर आयोजित केल्याचे समोर आल्याने खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| ०१) | भोईवाडा पो.ठाणे गु.र.क्र. ३६२/२०२१ कलम ३०८, ४२०,४१९, ४६५,४६७, ४६८, ४७१, १८८, २६९,२७०,२७४, २७५,२७६ ३४ भादवि सह कलम ६६(सी) माहीती तंत्रज्ञान अधिनियम सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम |
| ०२) | खार पो.ठाणे गु.र.क्र. ५२०/२०२१ कलम ४२०,२६८,२७०,२७४ २७५,२७६,१८८,३४ भादवि सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम |
| ०३) | बोरीवली पोलीस ठाणे गु.र.क्र. ८५५/२०२१ कलम १८८,४२०,१२०(ब)४६५,४६८,४७१ भादवि सह कलम ४३(अ),६६(क) माहीती तंत्रज्ञान अधिनियम |
| ०४) | बोरीवली पोलीस ठाणे गु.र.क्र. ८५०/२०२१ कलम १८८,४२०,१२०(ब),भादवि कलम ५२ डिझास्टर मॅनेजमेन्ट ॲक्ट कलम १८(अ) २४,२७,२८(अ) ड्रग्स ॲन्ड कॉस्मेटिक अधिनियम |
| ०५) | बांगूर नगर पो.ठाणे गु.र.क्र. ४७४/२०२१ कलम ३०८, ४१९, ४२०, २६८, २७०, २७५, १८८,३४ १२० ब भादिव सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम कलम ५२ डिझास्टर मॅनेजमेन्ट ॲक्ट कलम १८(अ) २४,२७,२८(अ) ड्रग्स ॲन्ड कॉस्मेटिक अधिनियम |
| ०६) | वर्सोवा पो.ठाणे गु.र.क्र. २५२/२०२१ कलम १८८,२६८,२७०, २७४,२७५, २७६,४१९, ४२०,४६५, ४६७,४६८,४७१,३४ भादिव सह कलम ४३,६६(क) माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ३ साथीचे रोग अधिनियम. |
| ०७) | समतानगर पो.ठाणे ५३३/२०२१ कलम ३०८,४२०,१२०(ब) सह १८८ भादवि सह कलम १८(अ), १८(ब) २४,२७,२८,२८(अ) ड्रग्स ॲन्ड कॉस्मेटिक अधिनियम सह कलम ५२ डिझास्टर मॅनेजमेन्ट ॲक्ट. |
| ०८) | अंबोली पो.ठाणे गु.र.क्र. ५३४/२०२१ कलम १८८,२६८,२७०,२७४,२७५,२७६,४१९, ४२०,३४, ३०८ भादवि सह कलम ०३ साथीचे रोग अधिनियम |
| ०९) | नौपाडा पोलीस ठाणे ठाणे शहर गु.र.क्र. १८५/२०२१ कलम १८८,२६८,२६९,२७०,२७४,२७५, २७६,३०८,४१९,४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४ भादवि सह कलम ३ साथीचे रोग अधिनियम |
| १०) | एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गु.र.क्र. ६३८/२०२१ कलम १८८,२६८,२७०,२७४,२७५, २७६,३०८, ४१९,४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१,३४ भादवि सह कलम ४३,६६ (क) आय.टी.ॲक्ट सह कलम ०३ साथीचे रोग अधिनियम सह कलम १८(अ),२४,२७,२८(अ) ड्रग्स ॲन्ड कॉस्मेटिक अधिनियम |

**कांदीवली पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप आयुक्त | विशाल हिरालाल ठाकूर, | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहाय्यक पोलीस आयुक्त बोरीवली विभाग, | सुनिल दत्तात्रय वडके, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | बाबासाहेब नामदेव साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस निरिक्षक | दिपशिखा दिपक वारे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरिक्षक | सुर्यकांत चंद्रकांत पवार, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरिक्षक | सुनिल उत्तरेश्वर वाघ, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरिक्षक | संदीप संभाजी पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ८ | स.पो.उ.नि | अनिल हरिश्चंद्र सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ९ | म.पो.शि. ०९०१२६० | मोनिका जॉन गोम्स | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. २९८०८ | संजय चंद्रकांत सकपाळ | |
| ११ | पो.ना.क्र. ९८०३६६ | सत्यवान शामराव जगदाळे | |
| १२ | पो.ना.क्र ९८०९३५ | अनिल परशुराम जैतापकर | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र ०४५८९ | जितेंद्र पांडुरंग निजाई | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र. ०५१५७ | रविंद्र रामहरी भोसले | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ०७१२६७ | रविंद्र पंडीत राऊत | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०८०३२३ | सचिन पुंडलिक भालेराव | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०८१७१५ | सुजन आनंदा केसरकर | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. १११७४ | दादासाहेब जगन्नाथ घोडके | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. १११३३० | संदीप वसंत म्हात्रे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ११३१४० | प्रविण सुनिल वैराळ | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ११३३६७ | चिरंजीव रमेश नवलू | |

मजकुर :—

दिनांक २९/०७/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' BEST CONVICTION OF THE MONTH " माहे जुन २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०२ | शिवाजीनगर पोलीस ठाणे परिमंडळ—०६ | गु.र.क्र. १५५/२०१४, कलम ३०७,३८७, ५०६ (२), ३२३,३४ भादवि सह कलम ३(१) (ii) व ३(४)मोक्का अधिनियम, सन १९९९ |

—: ' दहशत पसरवून खंडणी मागणे न दिल्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे ' :—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— यातील फिर्यादी श्री मोहम्मद नईम आसिकअली शहा, वय ३५ वर्षे हे चप्पलचा व्यवसाय करतात व त्यांचा भाऊ हा चोरीची लाईट चालवितो यावरून आरोपीतांनी फिर्यादी यांना दरमहा १० हजार रूपयाच्या हप्त्याची मागणी केली. तसेच फिर्यादी यांना टोकदार लादीने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केली. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री मोहम्मद नईम आसिकअली शहा, वय ३५ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | २२/०६/२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | | विक्रमसिंह गुमानसिंह राजपूत उर्फ विक्की उर्फ विक्की सिंग वय ३२ वर्षे अटक दिनांक २७/११/२०१६ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) कलम ३०७,३४ या कलमाखाली १० वर्षाची शिक्षा व १०,०००/— दंड व दंड न भरल्यास एक वर्षाची जादा शिक्षा.<br>२) कलम ३८७,३४ भादवि या कलमाखाली ५ वर्षाची शिक्षा व रू. ५,०००/— दंड व दंड न भरल्यास सहा महिन्याची शिक्षा.<br>३) कलम ३२३,३४ भादवि या कलमाखाली १ वर्षाची शिक्षा व १,०००/— दंड व दंड न भरल्यास १ महिन्याची जादा शिक्षा<br>४) कलम ३(१)(पप) एम.सी.ओ.सी. कायदा या कलमाखाली १० वर्षाची शिक्षा व ५ लाख दंड व दंड न भरल्यास २ वर्षाची शिक्षा<br>५) कलम ३(४) एमसीओसी कायदा या कलमाखाली १० वर्षाची शिक्षा व ५ लाख दंड व दंड न भरल्यास २ वर्षाची शिक्षा सुनावलेली आहे. |

तपास कौशल्य :— वरील नमुद गुन्हयात फर्यादी/ साक्षीदारांचे जबाब नोंद करणारे अधिकारी, आरोपीतास अटक करून त्याचे विरूध्द दोषारोपपत्र दाखल करणारे अधिकारी , तसेच नमुद गुन्हयात साक्षीदार यांना वेळेवर मा. न्यायालयात हजर करणारे कोर्ट स्टाफ, न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम करून मा. न्यायालयात अटक आरोपी विरूध्द शिक्षा लागणेयोग्य साक्षीदार हजर करणे व पुरावे सादर केल्याने आरोपीतास मा. न्यायालयाने १० वर्षाची शिक्षा व ५ लाखाचा दंड अशी शिक्षा सुनावलेली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, (सेवानिवृत्त), | रामचंद्र बहिरा माने | प्रशस्तीपत्रक |
| २ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | किशोर विश्वनाथ गायके | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरिक्षक | इक्बाल महंमद शिकलगार | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस निरिक्षक | भरत तुकाराम शेंडगे, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहायक पोलीस निरिक्षक | सचिन तुळशीराम सानप | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरिक्षक | दयाराम बाळाराम कडू | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ह.क्र. ३२५१७ | राजेश सखाराम दहिबावकर | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ना.क्र. ९८०५४२ | शिवाजी वसंत वायदंडे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ना.क्र.९७०५३८ | बापुराव शिवलिंग उगलमुगले | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ९८०६८४ | राजाराम यशवंत पाटील | |
| ११ | पो.शि.क्र.११३४२४ | संदिप बबन अवचर | |

टिप:— वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदीवली पोलीस ठाणे, व शिवाजीनगर पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month June – 2021 व Best Conviction of the June 2021 या करीता निवड झाले नंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र ‘क’ प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे

# **Best Detection of the Month**

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |

| | | |
|---|---|---|
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, प्दुनमेज पंचनामा,घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.